# महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग

१३ वा मजला, केंद्र क्र. १, जागतिक व्यापार केंद्र, कफ परेड, कुलाबा, मुंबई-४०० ००५
दूरध्वनी: ०२२-२२१६ ३९६४/२२१६३९६५, फॅक्स: २२१६३९७६
ई-मेल : mercindia@merc.gov.in
संकेत-स्थळ : www.mercindia.org.in/www.merc.gov.in

## जाहीर नोटीस

**जाहिरात क्रमांक.———/२०१८-१९**

**प्रारुप महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग(तफावत हिशोबपूर्तीची यंत्रणा आणि संबंधित बाबी) विनियम, २०१८ वर अभिप्राय मागविण्याबाबत.**

२००६ चे प्रकरण क्रमांक ४२ मध्ये, दिनांक १७ मे, २००७ रोजी आयोगाने स्वतःहून तयार केलेला आदेश लागु केला गेला, यामुळे महाराष्ट्रामध्ये भारित सरासरी प्रणाली सीमांत मूल्य निर्धारणावर (वेटेड ॲव्हरेज सिस्टम मार्जिनल प्रायजिंग) आधारलेली उपलब्धता आधारित वीजदर यंत्रणा (अव्हेलेबलिटी बेस टेरिफ) लागु करण्यात आली.

आयोगाने महाराष्ट्रातील विद्यमान समतोल आणि हिशोबपूर्ती यंत्रणेचे पुनरावलोकन (बॅलन्सिंग ॲण्ड सेटलमेंट मेकॅनिझम) आणि तफावत हिशोबपूर्ती यंत्रणा लागु करण्याचे निश्चित केले आहे.

त्यानुसार, महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग(मविनिआ) च्या प्रारुप (तफावत हिशोबपूर्तीची यंत्रणा आणि संबंधित बाबी) विनियम, २०१८ स्पष्टीकरणात्मक टिप्पणीसह आयोगाच्या www.mercindia.org.in / www.merc.gov.in या संकेत-स्थळांवर उतरवून घेण्याच्या स्वरुपात उपलब्ध आहे.

आयोग, या प्रारुप विनियमांवर लेखी अभिप्राय, सूचना आणि/किंवा हरकती मागवित आहे.सदर अभिप्राय, सूचना आणि/किंवा हरकती,आयोगाचे सचिव यांना, मविनिआ,१३ वा मजला, केंद्र क्र. १, जागतिक व्यापार केंद्र, कफ परेड, मुंबई – ४००००५ या पत्त्यावर व्यक्तिशः किंवा पोस्टाने किंवा फॅक्स क्र. -०२२-२२१६३९७६ किंवा mercindia@merc.gov.in या ई-मेलद्वारा पाठवाव्यात.

दिनांक २३ नोव्हेंबर, २०१८ रोजी किंवा त्यापूर्वी प्राप्त झालेले सर्व अभिप्राय, सूचना आणि/ किंवा हरकती, या प्रारुप विनियमांना अंतिम स्वरुप देण्यापूर्वी, आयोगाद्वारे विचारात घेण्यात येतील.

दिनांकः २३ ऑक्टोबर, २०१८ सचिव,मविनिआ

स्थळः मुंबई